जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/१८७०९/२०२३

**वाहतुक नियंत्रण अधिसुचना** दिनांक ०८/०८/२०२३

कावेरी नगर अंडरपास हा अरुंद असून १६ नंबरकडून काळेवाडी फाट्याकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडची रुंदी खुपच कमी आहे. तसेच त्याठिकाणावरुन पवारनगर गल्ली व थेरगावकडे जाणारी लेन असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>वाकड वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

- कावेरीनगर सब वे मधुन मो.सा.,रिक्षा खेरीज करुन इतर सर्व वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>**

१. कावेरीनगर वेणुनगर कडून काळेवाडी फाट्याकडे जाणाऱ्या वाहन चालक गुजरनगर अंडरपास येथून इच्छित स्थळी जातील.

२. १६ नंबरकडून वेणुनगर, कावेरीनगरकडे जाणाऱ्या वाहन चालक काळेवाडी फाटा येथून यु-टर्नघेवून इच्छित स्थळी जातील.

तरी वरील प्रमाणे वाकड वाहतुक विभाग अंतर्गत वाहतुक बदलाबाबतची अधिसुचना (नोटीफिकेशन) काढण्यात येत असुन नागरीकांनी वरील प्रमाणे मार्गाचा वापर करावा

सदरचे अधिसुचना अमंलबजावणी ०८/०८/२०२३ पासुन करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त,परि२
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **वाकड** वाहतुक विभाग,

४) कार्यकारी अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner